**शैक्षणिक वर्ष** [ ] **माहितीपत्रक क्र.** [ ]

## पी ई एस मॉडर्न मुलींचे वसतिगृह मोशी, पुणे ४११०७०

**कार्यालयीन वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायं ५.००**

**कार्यालयीन फोन नं.:**

## <u>वसतिगृहात प्रवेश घेतल्यानंतर पाळावयाचे नियम</u>

पी ई एस मॉडर्न मुलींचे वसतिगृह मोशी, पुणे ४११०७० येथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थीनीने वसतिगृहाची नियमावली वाचलेली असावी व त्या नियामावलींचे पालन करणे बंधनकारक आहे. या नियमावलीतील नियमांमध्ये पूर्व सूचनेशिवाय बदल करण्याचा किंवा दुरुस्ती करण्याचा अधिकार वसतिगृह संचालक समितीस आहे. विद्यार्थीनीना केले गेलेले बदल त्या त्या वेळी कळविले जातील.

### <u>प्रवेश</u>

१) पी ई एस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (फक्त महिलांकरिता) मोशी मध्ये शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी वसतिगृहाच्या उपलब्ध जागेनुसार प्रवेश मिळण्यास पात्र ठरतील.
२) स्थानिक (पुणे शहर) विद्यार्थीनिंना प्रवेश मिळू शकणार नाही.
३) वसतिगृहाची पूर्ण फी भरल्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.
४) प्रवेश अर्जासोबत वैदयकीय दाखला (मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) जोडणे आवश्यक आहे.
५) विद्यार्थीनीस शारीरिक व मानसिक आजार असल्यास डॉक्टरांच्या वैदयकीय दाखल्यासह पालकांनी लेखी स्वरुपात माहिती द्यावी.
६) वसतिगृह संचालक समितीस कोणतेही कारण न देता एखादा अर्ज नाकारण्याचा संपूर्ण अधिकार आहे.
७) विद्यार्थीनी बरोबर आलेले पालक /स्थानिक पालक हे विद्यार्थीनीची वसतिगृहातील फी भरण्यास जबाबदार राहतील. स्थानिक पालक हे पुण्यात राहणारेच असावेत.
८) वसतिगृहात प्रवेश घेताना विद्यार्थीनीने स्थानिक पालकांचे नाव, पत्ता व फोन / मोबाईल नंबर अर्जावर लिहिणे आवश्यक आहे.
९) वसतिगृहाने दिलेल्या खोलीतच विद्यार्थीनीने राहणे तिच्यावर बंधनकारक आहे. त्या संदर्भात विद्यार्थीनीची कोणतीही तक्रार चालणार नाही. विद्यार्थीनीची खोली बदलणे हे पूर्णपणे वसतिगृहाच्या अधिकारात राहील.
१०) वार्षिक परीक्षेत नापास झाल्यास विद्यार्थीनीस वसतिगृहात राहता येणार नाही.
११) वार्षिक परीक्षा संपेपर्यंतच विद्यार्थीनीस वसतिगृहात राहता येईल. पुढील वर्षी कॉलेज सुरु होण्यापूर्वी एक दिवस आधी वसतिगृहात येता येईल.

### कागदपत्रे

१) आधार कार्ड झेरोक्स कॉपी, २ फोटो' ( विद्यार्थिनी चे)
२) आधार कार्ड झेरोक्स कॉपी, २ फोटो' ( पालकांचे )
३) आधार कार्ड झेरोक्स कॉपी, २ फोटो' ( स्थानिक पालकांचे )

### <u>शिस्तीचे नियम (Discipline)</u>

१) विद्यार्थीनीने वसतिगृहात रात्री ८.०० ते सकाळी ६.०० पर्यंत वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

२) वसतिगृहात संध्याकाळी ८.०० नंतर येणाऱ्या विद्यार्थीनीची नोंद केली जाईल. लेट मार्क नंतर तिच्या कॉलेजमधील एच.ओ.डी किंवा प्राचार्यांना व पालकांना कळविले जाईल.

३) महिन्यातून २ वेळा नाईट आउट दिले जातील. नाईट आउट घेतेवेळी स्थानिक पालकांची परवानगी घेणे आवश्यक आहे. अचानक आवश्यकता भासल्यास, काही दिवस घरी जावयाचे असल्यास, विद्यार्थीनीने आपल्या प्राचार्यांची /विभागप्रमुख यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच वसतिगृहातून परवानगी मिळू शकेल. सुट्टीला जाताना कमीतकमी १ दिवस आधी पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे.

४) जर एखादी विद्यार्थीनीपूर्व परवानगी न घेता रात्री ८.०० ते सकाळी ६.०० च्या वेळात वसतिगृहा बाहेर राहिली तर तिचा वसतिगृह प्रवेश त्वरित रद्द केला जाईल. तिच्या पुढील प्रवेशा संदर्भातील अंतिम निर्णय वसतिगृह व्यवस्थापन समितीवर अवलंबून असेल.

५) विद्यार्थीनीस भेटावयास येणाऱ्या व्यक्तींनी (आई, वडील, आणि स्थानिक पालक फक्त) दुपारी ५.०० ते संध्याकाळी ७.३० या वेळातच भेटावे. संध्या. ७.३० नंतर भेटीस येणाऱ्यांनी वसतिगृह आवारात थांबू नये.

६) रात्री १०.०० ते सकाळी ६.०० या वेळेत वसतिगृहात पूर्ण शांतता राखणे आवश्यक आहे. रात्री १० नंतर कोणत्याही प्रकारचा गोंधळ, गडबड खपवून घेतली जाणार नाही. तसेच रात्री १०.०० नंतर कोणाच्याही खोलीत जाता येणार नाही.

७) शारीरिक वा मानसिक रॅगिंग हा कायद्याने गुन्हा असून जर कोणी रॅगिंग करण्याचा प्रयत्न केल्यास योग्य ती कडक कारवाई केली जाईल.

८) वसतिगृहात राहणाऱ्या मुलींनी वसतिगृहात तसेच त्यांना दिलेल्या खोलीत स्वच्छता व आरोग्य राखावे. भिंतीवर लिहिणे, पोस्टर लावणे, चित्र काढणे वा चिकटवणे अन्य प्रकारे भिंती, दरवाजे खराब करणे इ. गोष्टीस मनाई आहे. असे आढळल्यास दंड आकारण्यात येईल. वसतिगृह समितीचे अधिकारी व रेक्टर यांना खोलीत केव्हाही येण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार आहे. सॅनीटरी कचरा कागदात गुंडाळून बाथरूमच्या बाहेर कचऱ्याच्या पेटीतच टाकणे बंधनकारक आहे.

९) वसतिगृह व वसतिगृहाचे आवारात भारतीय संस्कृतीला साजेसा पोशाख असावा.

१०) वसतिगृहातील विद्यार्थीनीकडून फर्निचर व इतर सामानाची तोडफोड झाल्यास योग्य तो दंड आकारला जाईल किंवा त्याची किंमत तिच्या अनामत रकमेतून वसूल केली जाईल.

११) वसतिगृहाच्या खोलीत रोख रक्कम किमती वस्तू वा दागिने, संगणक स्वतःच्या जबाबदारीवर ठेवता येतील, परंतु ते हरवल्यास किंवा चोरी झाल्यास वसतिगृह जबाबदार असणार नाही.

१२) वसतिगृहात वसतिगृह रेक्टर, प्रमुखांच्या परवानगीशिवाय विद्यार्थीनिंना वाढदिवस किंवा अन्य कार्यक्रम साजरे करता येणार नाहीत.

१३) प्रत्येक विद्यार्थीनीने आपली वर्तणूक अन्य विद्यार्थीनिंना उपद्रव होईल अशी ठेवू नये.

१४) बाहेरील क्लास लावायचे असल्यास त्या संदर्भात क्लास लावण्यापूर्वी वसतिगृहातील संबंधितांशी बोलणे आवश्यक आहे. शक्यतो संध्या ८.०० च्या आतील क्लासच्या वेळा असाव्यात. क्लासला जाणाऱ्या विद्यार्थीनीनी अर्ज करुन संबंधित क्लासमधून सही शिक्का, पता, फोन नं. इ. ची पूर्तता करावी. क्लासला जाणाऱ्या विद्यार्थीनिंनी जाता येता ऑफिसमध्ये ठेवलेल्या वहीत नोंदी कराव्यात.

१५) प्रत्येक विद्यार्थीनीने वसतिगृहाचे अधिकारी, सेवक वर्ग, मेस कर्मचारी इत्यादिशी आदराने व सौजन्याने वागावे. विद्यार्थीनीचे वर्षभरातील सर्वसाधारण वर्तन व शिस्त यांचे निरीक्षण केले जाईल, गैरवर्तन किंवा गैरकृत्य आढळल्यास तिला समज दिली जाईल तसेच पालकांनाही कळविले जाईल. बेशिस्त वर्तन केल्यास वसतिगृह प्रवेश रद्द करण्याचा अधिकार वसतिगृह संचालक समितीकडे राहील. विद्यार्थिनींच्या गैरवर्तनामुळे तात्पुरती, कायमस्वरूपी दुखापत, अपंगत्व किंवा विद्यार्थ्याचा मृत्यू अशा स्वरूपाची कोणतीही दुर्घटना घडल्यास, अशा कोणत्याही दुर्दैवी घटनेसाठी संस्था, हॉस्टेल किंवा घटनेसाठी महाविद्यालय जबाबदार राहणार नाही,

१६) सणासुदीच्या वेळी असलेल्या सुट्ट्या व कॉलेजमधील असलेल्या सुट्ट्यांच्या दिवशी वसतिगृहातून बाहेर फिरावयास जाणाऱ्या विद्यार्थीनिंनी ऑफिसमध्ये असलेल्या वहीत जाता येता नोंदी करणे आवश्यक आहे.

## मेस

१) प्रत्येक विद्यार्थीनीस मेसमधील जेवण बंधनकारक राहील.
२) मेसमध्ये फक्त शाकाहारी जेवण दिले जाईल.
३) मेसमध्ये दोन वेळचे जेवण, चहा,नाश्ता दिले जाईल.
४) जेवण भोजन हॉलमध्येच दिले जाईल, बाहेरील पदार्थ आणण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) मेसमधील कोणत्याही प्रकारची भांडी स्वतःच्या खोलीत नेऊ नयेत.
६) सर्व विद्यार्थीनिंनी चहा, नाश्ता व जेवणाच्या वेळा पाळाव्यात.
७) चहा दुध / दुपारचा नाश्ता इ. कोणालाही खोलीत नेता येणार नाही.
८) भोजनात दिल्या जाणाऱ्या पदार्थाविषयी काही सूचना असल्यास वसतिगृहातील संबंधित रेक्टरकडे द्याव्यात, परस्पर मेसमध्ये त्यासंबंधी चर्चा करु नये.
९) जेवणाच्या पानात हवे तेवढेच अन्न घ्यावे, अन्न वाया घालवू नये.
१०) खोलीबाहेरील कचऱ्याच्या डब्यांमध्ये अन्नपदार्थ टाकू नये, अन्यथा त्याबद्दल दंड करण्यात येईल.

## पैसे परत मिळणे (Refund) बाबत

१) वसतिगृहात प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणाने वसतिगृह सोडावयाचे असेल तर नियमानुसार अनामत रकमेतून काही रक्कम कापून उर्वरित रक्कम दिली जाईल. पालकांनी तसा अर्ज करणे आवश्यक आहे.
२) विद्यार्थीनीने वसतिगृह सोडल्यापासून एक वर्षाच्या आत अनामत (डिपॉझीट) रक्कम परत न नेल्यास त्यानंतर अनामत रक्कम मिळणार नाही.
३) वसतिगृह डिपॉझीट / अनामत रक्कम मूळ पावत्या दाखविल्याशिवाय परत मिळणार नाही अनामतरकमेतून प्रत्येकी २५% रक्कम कपात केली जाईल.
४) अनामत रकमेचा परतावा चेकद्वारे दिला जाईल.
५) विद्यार्थीनी मध्येच वसतिगृह सोडून गेल्यास व वसतिगृहाचे येणे बाकी असल्यास अनामत रकमेतून येणे कापून घेण्यात येईल.

## फोन / मोबाईल

१) अत्यंत गरजेच्या वेळी वसतिगृह ऑफिसमधील फोनचा वापर पूर्वपरवानगी घेऊन करता येईल .
२) मोबाईलचा अतिवापर टाळावा. रात्री ११ ते सकाळी ६ मोबाईल वापरण्यास मनाई आहे. आपल्या मोबाईलवर बोलण्याचा इतरांना त्रास होऊ देऊ नये.

## टर्म

१ ली टर्म शैक्षणिक वर्ष जुलै ते डिसेंबर अखेर
२ री टर्म जानेवारी ते वार्षिक परीक्षा संपेपर्यंत
दोन्हीही टर्मला सुरुवात झाल्यावर टर्म फी भरणे विद्यार्थीनींना बंधनकारक आहे. त्याशिवाय वसतिगृहात प्रवेश मिळू शकणार नाही.

## विद्युत उपकरण

१) वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थिनीने वीज व पाण्याचा वापर काटकसरीने करावा.
२) खोलीतून बाहेर जाताना वीज, पंखे, मोबाईल चार्जिंग बटने बंद करावीत.
३) टॉयलेट, बेसीन, बाथरूममधील नळ वेळोवेळी बंद करावेत.
४) इतर विजेच्या उपकरणांचा वापर करू नये. (उदा. इस्त्री, वॉटर हिटर इ.)
५) ब्युटीपार्लरचे कुठलेही साहित्य वसतिगृहात आणण्यास मनाई आहे. ( उदा. हेअर ड्रायर)
६) स्नानासाठी सोलर वॉटर सिस्टिमची सोय उपलब्ध आहे.
७) करमणुकीसाठी टी. व्ही. ची सोय उपलब्ध आहे. इतर खेळाचे साहित्य उदा. कॅरम बोर्ड, टेनीस इ.

## आजारपण

१) आजारी असल्यास संबंधित रेक्टरना कल्पना देणे आवश्यक आहे.
२) गरजेप्रमाणे वसतिगृहाच्या वॉर्डनना कळविले जाते. त्याचबरोबर पालकांना कळविण्यात येते.
३) तसेच पालकांना कल्पना देऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाते.
४) वैद्यकीय खर्च हा ज्याचा त्यानेच करावयाचा आहे.

## मुलींसाठी सुविधा

१) प्रत्येक विद्यार्थीनीस कॉट, टेबल, खुर्ची, कॉम्पुटर टेबलचप्पल स्टॅन्ड व  सामानासाठी कपाट
२) करमणुकीची साधने उदा.  टी.व्ही., खेळाचे साहित्य
३) आवश्यकतेनुसार फॅन, ट्यूबलाईट, मोबाईल चार्जिंगसाठी पॉइंट
४) सोलर सिस्टिमचे गरम पाणी
५) पिण्याचे पाणी (फिल्टरसह कुलर)
६) वापरायचे पाणी स्वतंत्र (मुबलक)

## येताना आणावयाचे साहित्य

१) स्नानासाठी बादली, मग
२) चहा/  दुध घेण्यासाठी मग
३) टिफीनसाठी (मधले खाणे)  साठी डीश /  बाऊल १ चमचा वाटी
४) कपाट व टेबलच्या ड्रॉवरसाठी २ छोटी कुलुपे आणि साखळी.
५) स्वतःचे आवश्यक सामान बेडवर टाकण्यासाठी बेडशीट, पांघरूण इ.

## सांस्कृतिक कार्यक्रम

१) वसतिगृहात महाराष्ट्रीय सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातील. उदा. गणेशोत्सव, दीपोत्सव, होळी, गुढीपाडवा इ.
२) वसतिगृह दिन (हॉस्टेल डे)  मोठ्या उत्साहाने साजरा होतो.  त्यानिमिताने मुलींच्या वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित करुन बक्षीसपात्र मुलींना बक्षिसे दिली जातात, कॉलेजमध्ये विशेष नैपुण्य मिळविणाऱ्या व वसतिगृहातील चांगले वर्तन असणाऱ्या विद्यार्थीनीना प्रोत्साहन व शाबासकी दिली जाते.